आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
९ एप्रिल २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकांसाठी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत केरळात ७५ आणि आसाममधे ८४ टक्क्यापेक्षा जास्त, तर पुदुचेरीत सुमारे ८७ टक्के मतदान

- पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूत प्रचाराला जोर, बारामती विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार

- १५ हजार ४०० टन एलपीजी घेऊन भारताचं ग्रीन आशा जहाज मुंबईजवळच्या जेएनपीए बंदरात दाखल

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ९३१ अंकांची घसरण

**आणि**

- आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत भारतीय महिला संघानं १० पदकांसह पटकावलं अव्वल स्थान

**<><><><><>**

पुदुचेरी, आसाम आणि केरळ विधानसभा निवडणुकांसाठी आज शांततेत मतदान झालं. आसाममधल्या १२६, केरळममधल्या १४० आणि पुदुचेरीतल्या ३० जागांसाठी हे मतदान झालं.

संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आसाममधे ८४ पूर्णांक ४२ शतांश टक्के मतदान झालं. सर्वाधिक मतदान दक्षिण सलमारा मंकाचार जिल्ह्यात ९४ पूर्णांक ८ शतांश टक्के झालं.

केरळात ७५ पूर्णांक १ शतांश टक्के मतदान झालं. कोझिकोळ्ळ मधे सर्वाधिक म्हणजे सुमारे ७८ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुदुचेरीतल्या जवळजवळ ८७ टक्के मतदारांनी मतदान केलं.

**<><><><><>**

कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी देखील आज मतदान झालं आहे. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत बागलकोटमधे ६५ पूर्णांक ६८ शतांश तर दावणगिरीत ६३ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदान झालं.

नागालँडमधे  कोरिडांग मतदारसंघात ८० पूर्णांक ६२ शतांश टक्के तर त्रिपुरामधे धर्मनगर मतदारसंघात ७९ पूर्णांक ८४ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

<><><><><>

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी मागे घेण्याचा तर दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता.तिथे सर्व राजकीय पक्ष जोमाने प्रचार करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज पूर्व मेदिनीपूरमधे प्रचार सभा झाली. बंगालमधे युवकांना रोजगार पुरवण्यात तृणमूल काँग्रेसचं सरकार अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी प्रचाराच्या भाषणात केला. बंगालमधे पहिल्या टप्प्याचं मतदान येत्या २३ एप्रिलला १५२ मतदारसंघात  मतदान होईल. दुसऱ्या टप्प्याचं मतदान १४२ जागांवर २९ एप्रिलला मतदान होईल.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी देखील अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपत आहे. तिथे सर्व २३४ जागांसाठी येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रचाराला वेग आला आहे.

या सर्व निवडणुकांची मतमोजणी येत्या ४ मे रोजी होणार आहे.

<><><><><>

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांमधे पोटनिवडणूक बिनविरोध होणार नाही हे आज स्पष्ट झालं. उमेदवारी अर्ज मागं घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी बारामतीमधून काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी अर्ज मागे घेतला. बारामतीमध्ये सध्या २३ उमेदवार रिंगणात आहेत. तर राहुरीमध्ये २३ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानं ७ जण निवडणूक रिंगणात आहेत.

राहुरीमध्ये भाजपाचे अक्षय कर्डीले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह ४ अपक्ष उमेदवारांमध्ये लढत होणार आहे.

बारामती आणि राहुरीमध्ये २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

मुंबईतल्या चांदिवली विधानसभा निवडणुकीतल्या ईव्हीएमची तपासणी आणि छाननी करायला मुंबई उच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. २०२४ च्या विधानसभा

निवडणुकीत, शिवसेनेचे उमेदवार दिलीप लांडे यांनी, चांदिवली मतदारसंघातून नसीम खान यांचा पराभव केला होता. या निवडणूक निकालाविरोधात खान यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांनी हा आदेश दिला.

**<><><><><>**

महिला आरक्षण विधेयक अधिक बळकट करण्यासाठी १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षण याबाबत लेख लिहून तसंच समाज माध्यमावरच्या चित्रफितीतून माहिती दिली आहे. विधीमंडळांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्व सुनिश्चित करणं, हे बळकट आणि सर्वसमावेशक लोकशाहीसाठी अत्यावश्यक असल्याचं सांगितलं.

देशाच्या लोकसंख्येत निम्मा वाटा असलेल्या महिलांचं राष्ट्राच्या उभारणीतलं योगदान अमूल्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. महिला जेव्हा प्रशासकीय तसंच निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात, तेव्हा त्या आपल्या अनुभवांतून आणि दृष्टिकोनातून प्रशासनाची गुणवत्ता वाढवतात, असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

१५ हजार ४०० टन एलपीजी साठा घेऊन भारताचं ‘ग्रीन आशा’ हे जहाज होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून आज मुंबईजवळ जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या बंदरात दाखल झालं. इराण, विरुद्ध अमेरिका आणि इस्राएलचं युद्ध सुरु झाल्यापासून जे एन पी ए बंदरात आलेलं हे पहिलंच एलपीजीवाहू जहाज आहे. बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी नवी दिल्लीत आयोजित आंतरमंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

देशात घरगुती वापराच्या सिलेंडर्सचं वाटप १०० टक्के करण्याची ग्वाही सरकार देत असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं.

**... होल्ड - बाईट सुजाता शर्मा ...**

देशात आवश्यक औषधांचा पुरवठा अखंडित रहावा याकरता केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याची माहिती औषधनिर्माण विभागाचे संयुक्त सचिव टी एल सत्यप्रकाश यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९३१ अंकांची घसरण झाली आणि तो ७६ हजार ६३२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २२२ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ७७५ अंकांवर बंद झाला.

<><><><>

मंगोलियात उलानबतार इथे झालेल्या आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला संघाने १० पदकांसह अव्वल स्थान पटकावलं आहे. यात चार सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्यपदकांचा समावेश आहे. सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंमध्ये मीनाक्षी, प्रीती, प्रिया आणि अरुंधती या चौघींचा समावेश आहे. पुरुष गटाची अंतिम फेरी उद्या होणार असून त्यात विश्वनाथ सुरेश आणि सचिन हे दोन्ही भारतीय खेळाडू आहेत. त्यामुळे भारताची दोन पदकं निश्चित झाली आहेत.

<><><><>

चीनमध्ये निंगबो इथं सुरु असलेल्या बॅडमिंटन आशिया अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष एकेरी गटात भारताच्या आयुष शेट्टी यानं तैवानच्या ची यु जेन याला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. परंतु एच एस प्रणॉय पराभूत होऊन स्पर्धेबाहेर गेला आहे. महिला एकेरी गटातही भारताची पी व्ही सिंधू चीनच्या द्वितीय मानांकन प्राप्त वांग झियी कडून पराभूत होऊन स्पर्धेबाहेर गेली आहे. मिश्र दुहेरीतही भारताचा संघ पराभूत झाला आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज कोलकाता इथं कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सच्या ८ षटकात १ बाद ७४ धावा झाल्या होत्या.

<><><><>

आंध्र प्रदेशात आज अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमित बरदार यांच्यासमोर पाच माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यात एक डीव्हीसीएम दर्जाचा सदस्य, तीन एसीएम/पीपीसीएम दर्जाचे सदस्य आणि एका कॅडर सदस्याचा समावेश आहे. डीव्हीसीएम दर्जाच्या माओवाद्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस होतं. तर उर्वरित माओवाद्यांवर प्रत्येकी एक

लाख रुपयांचं बक्षीस होतं. हे माओवादी यापूर्वी दक्षिण बस्तरमध्ये कार्यरत होते आणि ते हिडमा गटासोबत काम करणाऱ्या पीएलजीएचा भाग होते, अशी माहिती अधीक्षक अमित बरदार यांनी दिली आहे. आंध्रप्रदेश-तेलंगणा सीमेवर झालेल्या अनेक स्फोटांच्या घटनांमध्ये त्यांचा सहभाग होता.

<><><><><>

बालकांना सकस अन्नाची असलेली गरज सार्वत्रिक असून तिचे एका लोकचळवळीत रूपांतर व्हावं यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे. ‘पोषण पखवाडा २०२६’ च्या ८व्या टप्प्याचा प्रारंभ त्यांनी आज नवी दिल्लीत केला तेव्हा त्या बोलत होत्या. ‘बालकांच्या पहिल्या सहा वर्षांमध्ये जास्तीत जास्त मेंदूचा विकास घडवून आणणे’ हा या पोषण पखवाड्याचा विषय आहे. स्थानिक आणि पारंपरिक पोषक पदार्थांची मातांना नव्याने ओळख करून देणे त्याद्वारे ॲनिमिया आणि कुपोषण कमी करणे यावर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भर द्यावा असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

दूरदर्शनने आज नवी दिल्लीत भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेबरोबर सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या भागीदारीचा उद्देश दूरदर्शनच्या दूरचित्रवाणी, रेडिओ आणि डिजिटल अशा विस्तृत परिसंस्थेचा उपयोग करून परिषदेच्या सांस्कृतिक आशयाची पोहोच वाढवणं हा असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने म्हटलं आहे. या करारानुसार, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या सांस्कृतिक सामग्री आणि कार्यक्रमांचं प्रसारण दूरदर्शनच्या विविध माध्यमांवर केलं जाणार आहे.

//<><><><><>//